# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### विकलांग व्यक्तीच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्यासाठी सुधारित कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१) १९९९ (१८-०३-२०२०) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विकलांग व्यक्तीच्या मूलभूत हक्कांचे रक्षण करण्यासाठी केंद्र शासनाने तीन वर्षापूर्वी केलेल्या सुधारित कायदयाची महाराष्ट्र राज्यात अंमलबजावणी होत नसल्याबाबत मा.उच्च न्यायालयाने माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान तीव्र नापसंती दर्शविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सुधारित कायदयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३१-१०-२०२२) :** (१) हे खरे नाही.

मा.उच्च न्यायालय मुंबई येथील दाखल मूळ जनहीत याचिका क्र. ८४/२०१२ (अवमान याचिका क्र. ५०/२०१२) मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक १७/१२/२०१९ रोजीच्या सुनावणी दरम्यान मंत्रालयातील सचिव, उप सचिव, तक्रार निवारण अधिकारी यांचे प्रशिक्षण आयोजित करण्याचे निर्देश शासनास दिले आहेत.

(२) मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार मंत्रालयीन सचिव, उप सचिव, तक्रार निवारण अधिकारी यांचे दिनांक ११/०१/२०२० रोजी वायसीएम सेंटर मुंबई येथे एक दिवसीय प्रशिक्षण घेण्यात आले आहे. तसेच यामध्ये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम मधील तरतूदींची अंमलबजावणी संबंधित विभागाने करणे विषयक मार्गदर्शन देण्यात आले. त्यानुसार संबंधित विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ मिळण्याबाबत

**(२) ३३९५ (२८-०५-२०२०) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय कर्मचारी आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि शिक्षक यांना अर्जित रजा रोखीकरण शासन परिपत्रकानुसार लागू करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिपत्रकानुसार अंमलबजावणी होत नसल्यामुळे शिक्षकांना त्याचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१४-१०-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

शिक्षक हे दीर्घ सुट्टी विभागातील कर्मचारी असल्याने त्यांना महाराष्ट्र खाजगी शाळांमधील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील तरतूदीनूसार दीर्घ सुट्टी कालावधीत सुट्टी घेण्यास सक्षम अधिकारी यांनी प्रतिबंधीत केले असल्यास त्याप्रमाणात अर्जित रजा अनुज्ञेय असून, अशा अर्जित रजेचे रोखीकरण देय आहे. त्यानूसार सातव्या वेतन आयोगातील सुधारित वेतन संरचनेनूसार अर्जित रजेच्या रोखीकरणाबाबत शासन निर्णय दिनांक ०४/०५/२०२२ निर्गमित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय रुग्णालयातून रुग्णांवर लावण्यात येणाऱ्या शुल्काबाबत

**(३) ७१०३ (१२-०८-२०१०) श्री.जयंत पाटील, श्री.कपील पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सर जे.जे.समूह रुग्णालयाच्या प्रशासनाच्या गैर कारभाराची श्री.शरद काळे यांच्या अध्यक्षतेखालील नेमलेल्या तज्ञ समितीने आपल्या शिफारशीसह दिनांक २८ ऑक्टोबर, २००९ च्या पत्रान्वये संचालकांचा अहवाल शासनास केव्हा प्राप्त झाला,

(२) सदर प्राप्त झालेल्या अहवालाच्या छाननीचे काम पूर्ण झाले आहे काय,

(३) असल्यास, शासन यासंबंधी पुढील कोणता निर्णय घेणार आहे ?

**श्री.दिपक केसरकर (१२-१०-२०२२) :** (१) होय, माहे नोव्हेंबर, २००९ मध्ये शासनास प्राप्त झाला आहे.

(२) होय.

(३) उक्त समितीने केलेल्या शिफारशींपैकी बहुतांश शिफारशींची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

---

## श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळ खानापूर चित्ता (ता.जि.हिंगोली) येथील विद्यासागर विद्यालयाच्या मुख्याध्यापकाचे वेतन व वेतनेतर अनुदान अदा करण्याबाबत

**(४) ८५२८ (२०-०७-२०२१) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळ, खानापूर चित्ता (ता.जि.हिंगोली) येथील विद्यासागर विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री संजय टाकळगव्हाणकर यांचे गत ऑगस्ट, २०१९ पासूनचे वेतन शासनाने बँकेत रोखून ठेवले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मुख्याध्यापक टाकळगव्हाणकर यांचे वेतन अदा करावेत असे मा.उच्च न्यायालयाचे आदेश दिला असतानाही शिक्षण विभागाने वेतन अदा न करण्याचे कारणे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यात कोरोना प्रादुर्भाव असल्याने न्यायालयीन प्रक्रिया सुरु नसल्याचा गैरफायदा अधिकारी घेत असून सदर शाळेचे वेतनेतर अनुदान सुध्दा अशीच चुकीची कारणे पुढे करून थांबविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर मुख्याध्यापकाचे वेतन व वेतनेतर अनुदान अदा करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१४-१०-२०२२) :** (१) हे खरे आहे.

संबंधित मुख्याध्यापकाने शाळेतील कार्यरत शिक्षकाचे वेतन काढले नाही व वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशाचे पालन केले नाही. तसेच मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांच्या आदेशाचा अवमान केला आहे, त्यामुळे मुख्याध्यापक श्री.संजय टाकळगव्हाणकर यांचे वेतन स्थगित केले आहे.

(२) संबंधित मुख्याध्यापकाचे वेतन अदा करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाचे आदेश प्राप्त झालेले नाहीत.

(३) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या आदेशान्वये विद्यासागर विद्यालय, खानापूर चित्ता, ता.जि.हिंगोली या शाळेस मिळणारे सन २०१८-१९ चे वेतनेतर अनुदान दिले नाही व सन २०१९-२० व २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात वेतनेतर अनुदान निधी वितरीत न करण्यात आल्याने वेतनेतर अनुदान देण्यात आलेले नाही.

(४) थकीत वेतन अदा करण्याबाबत मुख्याध्यापक श्री.टाकळगव्हाणकर यांनी मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.६९९०/२०२० दाखल केलेली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्याबाबत

**(५) ८५७८ (२०-०७-२०२१) श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७५ व महाराष्ट्र खाजगी शाळा (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित शाळांना लागू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील अनेक विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शाळा व्यवस्थापनाने टाळेबंदी काळात वेतन अदा न केल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शुल्क वसुलीची परवानगी द्यावी, शासनाने काढलेले परिपत्रक मागे घ्यावे, अशी मागणी 'महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टी असोसिएशन'ने (मेस्टा) व इतर शाळा संचालकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळा व्यवस्थापन आणि शिक्षकांना वेतन अदा करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१३-१०-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) कोरोना प्रार्दुभाव काळात शाळा बंद असल्याने खाजगी विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांना नियमित वेतन देण्यास शाळा व्यवस्थापनाकडून टाळाटाळ केली जात असल्याचे निर्दशनास आल्याने, अशा तक्रारी प्राप्त झाल्यास महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ व महाराष्ट्र खाजगी शाळा (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील तरतुदीनूसार कार्यवाही करण्याबाबत शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांना शासन पत्र दिनांक २७/०५/२०२० अन्वये कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भवानीनगर ते चिंचणी गणेशखिंड रोड (ता.वाळवा, जि.सांगली) येथील रेल्वे हद्दीतील पुलाखालील पाणी काढण्याचे काम धीम्या गतीने सुरु असल्याबाबत

**(६) ८६०९ (१५-०७-२०२१) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भवानीनगर ते चिंचणी गणेशखिंड रोड (ता.वाळवा, जि.सांगली) येथील रेल्वे हद्दीतील पुलाखाली साचलेल्या पाण्यामुळे नागरिक, आजारी व्यक्ती, शाळेतील विद्यार्थी, जेष्ठ नागरिक यांना प्रवास करण्यास त्रास होत असल्यामुळे पर्याय म्हणून नागरिक जीव धोक्यात घालून रेल्वे रुळावरून ये-जा करत असल्याचे माहे मार्च, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाखालील पाणी काढण्याचे काम अतिशय धीम्या गतीने सुरु असल्यामुळे साचलेले पाणी तातडीने काढण्याबाबतचे एक निवेदन श्री.विठ्ठल पांडुरंग पाटील, राहणार सोनकिरे (ता.कडेगाव, जि.सांगली) यांनी ग्रामपंचायत भवानीनगर, मा.पालकमंत्री सांगली, मा.कृषी राज्यमंत्री त्यांच्याकडे दिले असून सदर काम लवकर पूर्ण न झाल्यास उपोषणाला बसण्याचा इशाराही दिल्याचे दिनांक १७ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर पुलाखालील पाणी काढून नागरिकांना ये-जा करण्याकरीता रस्ता मोकळा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-१०-२०२२) :** (१) व (२) रेल्वे हा केंद्र सरकारचा विषय आहे. मध्य रेल्वेने कळविल्यानुसार हा पूल पाणी वाहून जाण्यासाठी बनविण्यात आला आहे. या पुलाचा वापर ये-जा करण्यासाठी करणे अपेक्षित नाही.

हा पूल पाणी वाहून जाण्यासाठी बनविण्यात आला असल्याने पुलाखालील पाणी काढण्याचे कोणतेही काम चालू करण्यात आलेले नाही असे मध्य रेल्वेने कळविले आहे. तसेच श्री.विठ्ठल पांडुरंग पाटील यांचे कोणतेही निवेदन या कार्यालयास प्राप्त झाल्याचे या कार्यालयाच्या अभिलेखावरून आढळून येत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाला “वैधानिक दर्जा” देण्याबाबत

**(७) ८६२२ (१७-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुसूचित जाती जमातीच्या समाजाच्या मागण्यांच्या अनुषंगाने या समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक तथा राजकीय सद्य:स्थितीचा अभ्यास करण्याच्या अनुषंगाने शासनास उपाययोजना सुचविण्यासाठी दिनांक १ मार्च, २००५ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग गठित करण्यात आलेला असून या आयोगाचे कामकाज गेल्या १६ वर्षापासून शासन निर्णयाच्या आधारे सुरु असून या आयोगाचे अधिकार, कर्तव्ये आणि कार्यकक्षा इत्यादीबाबत कुठलाही कायदा अद्याप करण्यात आलेला नाही किंवा आयोगास “वैधानिक दर्जा” देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुसूचित जाती जमाती यांच्यासाठी आयोग महत्वाचा असून या प्रवर्गाकरीता विकास योजना, त्यांचे मूल्यमापन, त्यांच्या विविध तक्रारी, सेवाविषयक, भरती विषयक शिक्षण क्षेत्राबाबत, निवडणूकीबाबत इत्यादी तक्रारी दूर करण्याच्या जबाबदाऱ्या या आयोगावर सोपविण्यात आलेल्या असल्या तरी या आयोगास वैधानिक दर्जा प्राप्त नसल्यामुळे आयोगाचे कामकाज परिणामकारक होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त आयोगास वैधानिक दर्जा देण्याच्या बाबीवर चर्चा करण्यासाठी दिनांक ११ मार्च, २०१५ रोजी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती व सदर बैठकीत आयोगास वैधानिक दर्जा देण्यास होकार देण्यात आला होता व त्यानुसार आयोगास वैधानिक दर्जा देण्यासाठी विधेयकाचा मसुदा तयार करण्याची प्रक्रिया सामाजिक न्याय विभाग आणि विधी व न्याय विभाग यांचेकडून सुरु करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुसूचित जाती जमाती आयोगास वैधानिक दर्जा देण्याबाबतचा निर्णयाची स्वरुप व सद्य:स्थिती बाबत पुढील कार्यवाही करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वैधानिक दर्जा देण्याबाबतची प्रक्रिया पूर्ण झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-११-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांनी अनुसूचित जाती जमातीच्या तक्रारी तसेच विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्राप्त अधिकारानुसार प्रयत्न केले असून त्याचा फायदा अनुसूचित जाती जमातीच्या लाभार्थ्यांना झालेला आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा देण्यासंदर्भात शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षकेतर कर्मचारी आणि शिक्षकांना अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ देण्याबाबत

**(८) ८६७० (१५-०६-२०२१) श्री.कपिल पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड : दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक ५१२५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शालेय शिक्षण विभागाच्या नियमानुसार शासकीय कर्मचारी, शिक्षकेतर कर्मचारी आणि शिक्षक तसेच मुख्याध्यापकांना निवृत्तीच्या वेळी शिल्लक रजेचे रोखीकरण शासन परिपत्रकानुसार अनुज्ञेय करण्यात आले असून सातवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर वित्त विभागाने दिनांक २४ मे, २०१९ रोजी शासन निर्णय काढूनही दोन वर्षापासून निवृत्त मुख्याध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी सदरहू लाभापासून वंचित असल्याचे दिनांक २६ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने स्थानिक, जिल्हास्तरावर व शिक्षक संचालक स्तरावर पत्र व्यवहार केला असून सदर निवृत्त मुख्याध्यापक व शिक्षकेत्तरांच्या रजा रोखीकरणाच्या प्रस्तावाबाबत शालेय शिक्षण विभागाकडून कोणताही निर्णय न झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना तसेच शिक्षकेतर कर्मचारी आणि शिक्षकांना अर्जित रजा रोखीकरणाचा लाभ मिळत नसल्याने सदर बाब तपासण्यात येत आहे, तसेच, सदर तपासणी अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू अहवालानुसार शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरण देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१३-१०-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) व (४) राज्यातील खाजगी मान्यताप्राप्त शाळांमधील दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या/होणाऱ्या/सेवेत असताना निधन झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ज्यांना अर्जित रजा देय आहे अशा कर्मचाऱ्यांच्या अर्जित रजेचे रोखीकरण सुधारित वेतन संरचनेनूसार करण्याबाबत दिनांक ४ मे, २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(९) ८९२१ (१५-०६-२०२१) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे कार्यालयाने गट-क संवर्गातील १३८ पदांकरीता दिनांक ३ जुलै, २०१७ रोजी जाहिरात प्रसिध्द करुन पात्र उमेदवारांकडून अर्ज मागवून अद्यापही सदरहू पदे सरळसेवेने भरण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात पशुसंवर्धन विभागात पशुधन विकास अधिकारी गट-अ ची २१९२ पदे मंजूर असून सध्या १६५७ अधिकारी कार्यरत आहे तर ५३५ पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात पशुची आरोग्यविषयक काळजी घेणेसाठी पशुधन विकास अधिकाऱ्यांची पदे भरणे आवश्यक असून सदर रिक्त पदे भरणेसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान जाहिरात प्रसिध्द करुन माहे डिसेंबर, २०१९ मध्ये परिक्षाही घेतल्या, परंतु अद्याप निकाल जाहीर केला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक २४ मार्च, २०२१ रोजीच्या शासन आदेशानुसार सदरील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याचे आदेश निर्गमित करण्यात आल्याने पशुवैद्यक पदवीधरामध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून चार वर्षापासून पशुसंवर्धन विभागाची कोणतीही भरती न झाल्यामुळे राज्यातील हजारो पदवीधर पशुवैद्यक शासकीय नोकरीच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दिनांक २४ मार्च, २०२१ रोजीचा शासन आदेश रद्द करुन नियमित भरती प्रक्रिया राबवून पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (३०-०९-२०२२) :** (१) पशुसंवर्धन विभागामधील एकूण १३८ गट-क ची रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक ०३/०७/२०१७ रोजी जाहिरात प्रकाशित करण्यात आली होती. दरम्यान दिनांक ११/०९/२०१७ च्या पत्राद्वारे विभागाने सुधारित आकृतीबंधाच्या संदर्भात वित्त विभागाकडून प्राप्त

सूचनांच्या अनुषंगाने उक्त भरती प्रक्रियेस स्थगिती दिली. दरम्यान, भरती प्रक्रिया महापरीक्षा पोर्टलद्वारे राबविण्याच्या सूचना शासनाद्वारे प्राप्त झाल्या मात्र तदनंतर महापरीक्षा पोर्टल बंद करण्यात आल्यामुळे सदर परीक्षा घेता आली नाही. दरम्यान कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर वित्तीय उपाययोजनाबाबत वित्त विभाग दिनांक ४ मे, २०२० च्या शासन निर्णयान्वये कोणत्याही प्रकारची नवीन पद भरती करु नये असे शासन आदेश असल्याने भरतीबाबतची पुढील प्रक्रिया राबविण्यात आली नाही.

आता सामान्य प्रशासन विभागाच्या (माहिती तंत्रज्ञान) शासन निर्णय दिनांक २१/०१/२०२१ व दिनांक ०४/०३/२०२१ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार ओएमआर व्हेंडरद्वारे पशुसंवर्धन विभागामधील गट क संवर्गामधील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाच्या मान्यतेने करण्याचे संकल्पित आहे.

(२), (३), (४) व (५) माहे मे, २०२१ अखेर पशुधन विकास अधिकारी गट-अ ची २१९२ पदे मंजूर असून १५४७ पदे भरलेली आहेत व ६४५ पदे रिक्त आहेत.

पशुधन विकास अधिकारी (गट-अ) यांची ४३५ रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे सरळसेवेने भरण्याकरीता दिनांक २३/०८/२०१९ च्या जाहिरातीनुसार कार्यवाही सुरु करण्यात आली असून दिनांक २२/१२/२०१९ रोजी चाळणी परीक्षा घेण्यात आली आहे. सरळसेवा भरतीची कार्यवाही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून पूर्ण होण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

राज्यातील काही जिल्हयांमध्ये कुक्कुट व इतर पक्ष्यांना एच१फाईव्ह१ (बर्ड फ़्ल्यू) या विषाणुचा प्रादुर्भाव झाल्याने तातडीची उपाययोजना म्हणून राज्यातील पशुपालकांना पशुस्वास्थ्यविषयक सेवा प्रदान करण्याच्या अनुषंगाने पशुधन विकास अधिकारी गट-अ संवर्गामधील रिक्त पदांपैकी अत्यावश्यक २०६ रिक्त पदे बाह्ययंत्रणेद्वारे तातडीने भरण्याबाबत कृषी व पदुम विभाग शासन निर्णय दिनांक २४/०३/२०२१ अन्वये मंजूरी देण्यात आली आहे. पशुधन विकास अधिकारी या पदाकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून नियमित स्वरूपात उमेदवार मिळेपर्यंत किंवा तात्पुरत्या स्वरुपात जास्तीत जास्त ११ महिने इतक्या कालावधीसाठी सदर मंजूरी देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस पात्र उमेदवार उपलब्ध करुन घेणेसाठी पाठपुरावा सुरु असून पशुधन विकास अधिकारी गट-अ या संवर्गातील रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी/नक्षलग्रस्त भागात असणाऱ्या राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे प्रोत्सहान भत्ता देण्याबाबत

**(१०) ९४५९ (१०-०६-२०२१) श्री.राजेश राठोड, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.बाळाराम पाटील, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी/नक्षलग्रस्त भागात असणाऱ्या राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना आर्थिक व बिगर आर्थिक सवलती अनुज्ञेय करता याव्यात याबाबतचा अभ्यास करण्यासाठी अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीने आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना (संस्थांतर्गत आश्रमशाळेच्या कर्मचाऱ्यांसह) सातव्या वेतन आयोगाप्रमाणे प्रोत्साहन भत्ता व इतर आर्थिक व बिगर आर्थिक सवलती अनुज्ञेय कराव्यात, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३१-१०-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठन करण्यात आलेल्या समितीकडून राज्यातील आदिवासी / नक्षलग्रस्त भागात सेवारत असणाऱ्या राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना कोणत्या आर्थिक व बिगर आर्थिक सवलती अनुज्ञेय कराव्यात, याबाबत अभ्यास करण्यात येत आहे,
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील पीएचडीच्या जागा भरण्याबाबत

**(११) ९५४२ (२०-०७-२०२१) श्री.रमेश कराड, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पीएचडीच्या ९०० जागा रिक्त असून चार हजार विद्यार्थी पेट उत्तीर्ण झाल्याचे माहे मार्च, २०२१ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांना संशोधन मार्गदर्शक मिळणार नसल्याने संशोधन केंद्राबाबत नेमलेल्या उपसमितीचा अहवाल मांडण्याची मागणी व्यवस्थापन परिषद सदस्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावलीचे उल्लंघन झाल्याने पेटची प्रक्रिया रद्द करण्याची तक्रार करण्यात आली असून विद्यापीठाच्या पेट परीक्षेची नियमावली आणि रिक्त जागांच्या वादामुळे रिक्त जागा व पात्र विद्यार्थ्यांचा ताळमेळ नसल्याने हजारो विद्यार्थी संभ्रमात आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, युजीसीची नियमावली अस्वीकृत केल्याने विद्यापीठाला पीएचडी व एमफील अभ्यासक्रम चालविण्याचा अधिकार राहत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार पीएचडीच्या रिक्त जागा भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (२६-०९-२०२२) :** (१) हे खरे नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात माहे मार्च, २०२१ च्या तिसऱ्या आठवड्यात एकूण ४८७२ जागा रिक्त असून एकूण ५०७९ विद्यार्थ्यांनी पेट परीक्षा उत्तीर्ण होऊन संशोधन मान्यता समिती समोर सादरीकरणासाठी अर्ज सादर केले होते.

(२) होय, हे खरे आहे.

व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांच्या मागणीप्रमाणे गठीत उपसमितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात आला होता.

(३) हे खरे नाही.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावलीचे उल्लंघन झालेले नाही. तसेच, पेट प्रक्रिया रद्द करण्यासंदर्भात संदिग्ध स्वरुपाची तक्रार प्राप्त झाली होती. पेट परीक्षेची नियमावली व रिक्त जागा यासंदर्भात कोणताही वाद निर्माण झालेला नाही.

(४) हे खरे नाही.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व विद्यापीठाच्या पीएच.डी प्रवेश अध्यादेशाचे पालन करुनच एम.फील, पीएच.डी चे प्रवेश देण्यात येतात.

(५) विविध विद्याशाखेच्या अधिष्ठातांनी ज्या ज्या विद्यार्थ्यांना संशोधन मार्गदर्शक उपलब्ध झालेले नाहीत, अशा सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज घेऊन त्यांना संशोधन मार्गदर्शक मिळण्यासाठी मदत केली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून अनामत म्हणून घेतलेली रक्कम परत करण्याबाबत

**(१२) ९७८८ (२०-०७-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठांशी संलग्नित सुमारे ३१४१ महाविद्यालयांमध्ये पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून अनामत म्हणून घेतलेली रुपये ५०० कोटींहून अधिक रक्कम अभ्यासक्रम पूर्ण झाला तरी विद्यार्थ्यांना परत दिली नसल्याने विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची अनामत म्हणून घेतलेली रक्कम त्यांना परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (१४-१०-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) विद्यार्थ्यांना देय असलेली अनामत रक्कम (Deposit) तात्काळ विद्यार्थ्यांना परत देणेबाबत विद्यापीठांना व महाविद्यालयांना निदेश देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद महापालिकेने क्वारंटाईन सेंटरमध्ये पुरविलेल्या साधनसामुग्री महापालिकेकडे परत जमा करण्याबाबत

**(१३) १०२६२ (०७-१०-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेने कोरोना साथीच्या काळात नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा देण्यासाठी शहरात १८ पेक्षा अधिक क्वारंटाईन सेंटर्स सुरु केल्याचे माहे जानेवारी, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त क्वारंटाईन सेंटरमध्ये नागरिकांसाठी पुरविण्यात आलेला गाद्या, उश्या, ब्लॅंकेट, टीव्ही, फ्रिज, रेडिओ, संगणक, मास्क, पल्स ऑक्सीमीटर, थर्मल गन, ऑक्सीजन फ्लो मीटर इ. कोट्यवधी रुपयांचे साहित्य सेंटर बंद केल्यानंतर महापालिकेकडे परत जमा केले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) चौकशी करण्यात आली असून यामध्ये कोणतीही अनियमितता अथवा गैरप्रकार आढळून आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अनुसूचित जाती-जमातीच्या कल्याणकारी योजनांच्या निर्णयाची अंमलबजावणी होण्याबाबत

**(१४) १०२७० (२९-०९-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती-जमातीच्या कल्याणकारी योजनांच्या निर्णयाची अंमलबजावणी होण्यासाठी शासनाने दिनांक ६ जून, २००६ रोजी अनुसूचित जाती-जमाती आयोग स्थापन करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आयोग स्थापन झाल्यापासून आयोगाकरीता लागणाऱ्या अधिकाराकरीता शासनाने कोणतेही कायदे तयार केले नसून हा आयोग विना कायदाच सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आयोगाचा कार्यकाळ माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान संपुष्टात आल्यामुळे कामकाज बंद पडले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने अनूसूचित जाती-जमाती आयोगासंदर्भात दखल घेऊन कायदे तयार करण्याची प्रक्रिया सुरू करावी यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-११-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाची स्थापना शासन निर्णय क्र.रामाआ २००३/प्र.क्र.१७५/मावक-१, दिनांक ०१ मार्च, २००५ अन्वये करण्यात आली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्त्या शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.०८/ समन्वय, दिनांक १०/०७/२०२० अन्वये रद्द करण्यात आलेल्या आहेत, असे असले तरी आयोगाचे दैनंदिन कामकाज आयोगाच्या अधिकारी/ कर्मचारी यांच्याकडून चालु ठेवण्यात आले होते. शासन निर्णय क्र.सीबीसी-१०/२०२०/प्र.क्र.२०/मावक, दिनांक २८/१०/२०२१ अन्वये आयोग पुनर्गठित करण्यात आला आहे.
(४) अनुसूचित जाती आयोगास वैधानिक दर्जा देण्यासदर्भांत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्याच्या मत्स्यव्यवसाय विभागात संशोधक किंवा शास्त्रज्ञ पदे नसल्याने जैवविविधता धोक्यात आल्याबाबत

**(१५) १०५२३ (०५-०१-२०२२) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई आणि आसपासच्या परिसरामध्ये येत असलेल्या सागरी प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर सागरी तळ, किनारपट्टी, खडकाळ आणि खारफुटीच्या भागांतील जैवविविधता यांचा अभ्यास करुन त्यानुसार निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता असतानाही राज्याच्या मत्स्य विभागामध्ये शास्त्रज्ञांची पदेच नसल्याचे दिनांक ११ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा प्रकल्पांच्या मान्यतेसाठी सागरी जैवविविधता अभ्यासून त्याच्या संवर्धनासाठी प्रयत्न न केल्यास सागरी जैवविविधता संपुष्टात येण्याची भीती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्याच्या समुद्रकिनाऱ्यावरील विविध सागरी प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर जैवविविधततेचे रक्षण करण्यासाठी राज्याच्या मत्स्य विभागात संशोधक किंवा शास्त्रज्ञांची पदे निर्माण करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मत्स्यव्यवसाय विभागात संशोधक किंवा शास्त्रज्ञ पदे निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (०७-१०-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

मुंबई व आजुबाजूच्या सागरी प्रकल्प उभारणीकरीता विकासक संस्थांकडून शासन धोरणानुसार संबंधित विभागाकडून अभ्यास करुन आवश्यक परवानग्या त्या-त्या विभागाकडून घेण्यात येतात.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद शहरातील गुंठेवारी भागातील मालमता नियमित करणेबाबत

**(१६) १०५६९ (०५-०१-२०२२) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरात सन २००५ नंतर मोठ्या प्रमाणावर गुंठेवारी वसाहती वाढल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गुंठेवारी वसाहतींची संख्या १५८ असून त्यांची २ लाख ५० हजार मालमता आहेत तसेच उक्त गुंठेवारी भागाची लोकसंख्या ५ लाख असून गुंठेवारी वसाहतींमधून निवडून आलेल्या नगरसेवकांचा विकास निधी उक्त वसाहतीमध्ये सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी खर्च करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औरंगाबाद शहरातील गुंठेवारीच्या वाढत्या वसाहती व लोकसंख्या विचारात घेता महानगरपालिकेने दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ पर्यंतच्या वसाहती नियमित करण्यासाठी सर्वसाधारण सभेत ठराव मंजूर करुन तो शासनाकडे पाठवला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेतला असून सदर निर्णयाचे रुपांतर विधेयकात होवूनही अद्याप शासन निर्णय काढण्यात न आल्यामुळे मालमत्ता नियमित करण्याची कार्यवाही प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने शासन निर्णय निर्गमित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-११-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) याबाबत सविस्तर सर्व्हेक्षण झालेले नाही असे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) हे खरे आहे,
(४) हे खरे नाही.

शासनाने महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ मधिल गुंठेवारी विकास नियमाधिन करण्याबाबतच्या पायाभूत दिनांकामध्ये दिनांक १ जानेवारी, २००१ ऐवजी दिनांक ३१ डिसेंबर, २०२० असा बदल केला असून याबाबतचा 'महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधिन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) सुधारीत अधिनियम, २०२१' हा दिनांक १२/०३/२०२१ रोजी अंमलात आला आहे.

सदर अधिनियमाच्या प्रती पुढील कार्यवाहीसाठी सर्व नियोजन प्राधिकरणे/ विशेष नियोजन प्राधिकरणे / जिल्हाधिकारी यांना पाठविण्याबाबत दिनांक २५/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविले आहे.
उपरोक्तानुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेने प्रत्यक्ष अंमलबजावणीस सुरुवात केली आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्ह्यात गुंठेवारी भागातील नागरिकांना जागेचे हक्क देऊन पीआर कार्ड देण्याबाबत

**(१७) १०६१७ (०५-०१-२०२२) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील गुंठेवारी भागातील रहिवाशांच्या जागेच्या मालकी हक्कासंदर्भात शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन त्यासंदर्भात शासन निर्णय देखील जारी करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील गुंठेवारी भागातील नागरिकांना त्यांच्या जागेचे मालकी हक्क देऊन पीआर कार्ड देण्याबाबतचा शासनाचा मानस आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरातील गुंठेवारी भागातील नागरिकांना पीआर कार्ड देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी देखील केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या औरंगाबाद शहरातील गुंठेवारी भागातील नागरिकांना जागेचे हक्क देऊन पीआर कार्ड देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१९-१०-२०२२) :** (१), (२), (३) व (४) शासनाने गुंठेवारी विकास (नियमीतीकरण दर्जावाढ, नियंत्रण) अधिनियम, २००१ ची अधिसूचना संपूर्ण राज्यात लागू केली आहे. यामधील तरतुदीअन्वये भूखंड नियमानुकूल करण्याचे व त्याबाबत अकृषिक आदेश निर्गमित करण्याचे अधिकार महानगरपालिका, औरंगाबाद यांना आहेत. सदर भूखंडावर अकृषिक आकारणी निश्चित करण्याचे अधिकार हे महसूल विभागास आहेत. ज्यावेळी एखादया भूखंडाचे सदर कायदयान्वये नियमितीकरण करण्यात येते त्यावेळी सदर भूखंड हा नगर भूमापन क्षेत्रामध्ये येत असेल तर त्याबाबतच्या नोंदी संबंधित भूखंडाच्या मिळकत पत्रिकेवर घेण्यात येतात. औरंगाबाद शहराच्या नगर भूमापन हद्दीमध्ये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १२२ मध्ये समाविष्ट असलेले सर्वे नंबर मधील भूखंडाचे गुंठेवारी कायदा अंतर्गत नियमानुकूलनाचे प्रस्ताव नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांचेकडे प्राप्त झाले नाहीत. सदर कायदयांतर्गत भूखंडाचे नियमानुकुलन व त्याबाबत अकृषिक आदेश व सदर भूखंडावर अकृषिक आकारणी सह अर्ज नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे प्राप्त झाल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४९ अन्वये कार्यवाही करण्याची दक्षता नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांनी घेतली आहे. गुठेवारी भागातील नागरिकांना पी आर.कार्ड देण्याच्या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे निवेदन भूमी अभिलेख विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी शहरातील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत

**(१८) १०६८२ (०६-०१-२०२२) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे : दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक ८७०५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील महानगरपालिकेच्या जागेवर तसेच रस्त्यांच्या दुतर्फा, शाळा, मार्केट आदी भागात करण्यात आलेले अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान विभागीय आयुक्त यांनी परभणी महानगरपालिका आयुक्तांना आदेशित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयुक्त, परभणी महानगरपालिका यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे शहरातील अतिक्रमणे निष्कासित करणे, फुटपाथवरील रहदारीस अडथळा दुर करणे, हॉकर्स झोन निर्माण करणे याबाबत प्रत्यक्षात कोणती सक्षम कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०९-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) परभणी शहर महानगरपालिकेमार्फत महानगरपालिकेच्या खुल्या जागा, इमारती रस्त्यांच्या दुतर्फा असणारे लहान मोठ्या नाल्यांवरील अतिक्रमणे, ओटे, फरश्या, टपऱ्या कच्ची बांधकामे काढण्याचे नियोजन करुन त्याप्रमाणे कारवाई करण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत, महानगरपालिकेमार्फत वसमत रोड ते उघडा महादेव मंदीर, गजानन नगर कॅनाल पर्यंत, राष्ट्रीय महामार्ग कार्यालयाचे अभियंता यांच्या उपस्थितीत परभणी शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील, अहिल्याबाई होळकर चौक ते धाररोड डंम्पीग मैदानापर्यंत, नारायण चाळ ते शिवाजी चौक ते जनता मार्केट ग्रॅड कॉर्नर परिसरातील अतिक्रमणे काढण्यात आलेली असून अतिक्रमणे पुन्हा होणार नाहीत याची दक्षता घेण्यात येत आहे.

राष्ट्रीय फेरीवाला धोरण-२००९ नुसार पथविक्रेता समिती स्थापन करण्यात आलेली आहे. परभणी शहरातील फेरीवाल्यांचे बायोमॅट्रीक पध्दतीने सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. सर्वेक्षणानुसार पात्र फेरीवाल्यांसाठी यादी हरकती व सुचना विचारात घेऊन अंतिम करण्यात आली आहे. तसेच पथविक्रेता समिती सदस्य नियुक्तीसाठी निवडणूक घेण्याकरीता पथविक्रेत्यांची यादी सरकारी कामगार अधिकारी, परभणी यांच्याकडे वर्ग करण्यात आलेली आहे.

रस्त्याचे ठिकाणी फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्र घोषित करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहरातील २० हजाराहून अधिक प्लॉट बेनामी असल्याबाबत

**(१९) ११०६४ (०५-०१-२०२२) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील सुमारे २० हजाराहून अधिक प्लॉट बेनामी असल्याचे दिनांक ६ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्लॉटवर भूमाफियांचा कब्जा असून अशा प्लॉट विक्रीच्या व्यवहारातून सर्वसामान्यांची फसवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर प्लॉट ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०९-२०२२) :** (१) महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम, २००१ च्या कलम ४(२)(क) च्या प्रावधनानुसार संबंधित भुखंडधारकाने गुंठेवारी अर्जासोबत भुखंडाच्या मालकीचा किंवा कायदेशीर कब्जा बाबतच्या कागदोपत्री पुरावा सादर करावयाचे आहे. भुखंडधारकाने सादर केलेल्या अर्ज /दस्तावेज अनुषंगाने नियमितीकरणाची कार्यवाही ना.सु.प्र.व्दारे करण्यात येते. तसेच आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत निदर्शनास आले नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी आश्रमशाळा व वसतिगृहातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीप्रक्रियेमध्ये झालेला गैरव्यवहाराबाबत

**(२०) ११६७७ (१९-११-२०२१) श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी आश्रमशाळा व वसतिगृहातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे भरण्यासाठी विशेष भरती प्रक्रिया राबविण्याबाबत आदिवासी विकास विभागाने दिनांक ५ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार अमरावती विभागाकडून गृहपाल पदाकरीता पदभरती प्रक्रिया राबविण्यात येऊन अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रतिक्षा यादीतील ३ नावांपैकी अनुक्रमांक १ वरील उमेदवार रुजू न झाल्यामुळे पुढील उमेदवाराला नियुक्ती देणे अनिवार्य असताना ३२ महिने उलटून गेल्यानंतरही सदर नियुक्ती देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आयुक्त, आदिवासी विकास यांनी दिनांक १३ जून, २०१८ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश देऊन देखील अप्पर आयुक्त, अमरावती यांनी त्याचे पालन केलेले नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, माहे फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्या पासून सुरु झालेली भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात केवळ तांत्रिक अडचणी निर्माण करण्यास व शासन उद्देशांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०७-०९-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक १३/०६/२०१८ नुसार निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी ग्राह्य असते. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक या कार्यालयाच्या पत्र क्र.४४८२ दिनांक ०७/०८/२०१९ अन्वये निवडसूची प्रसिध्द करण्यात आली असून सदर निवड सुचीला दिनांक ०६/०८/२०२० रोजी एक वर्ष पूर्ण झाले आहे. त्यामुळे सदरची निवड यादी ग्राह्य नाही. तथापि, मार्च, २०२० पासून साधारण: २ महिण्याचा कडक लॉकडाऊन व त्यानंतर २५% आणि ५० % कार्यालयातील उपस्थितीची मर्यादा, शासनाचे ०४/०५/२०२० च्या शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग वगळता कोणत्याही प्रकारची नवीन पदभरती करु नये असे निर्देश या सर्व बाबी लक्षात घेता प्रतिक्षा सूचीतील उमेदवाराला नियुक्ती देण्यात आली नाही.

आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे पत्र दिनांक १४/०७/२०२१ नुसार अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांनी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक १३/०६/२०१८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले होते. तद्नंतर अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांनी त्यांचे पत्र दिनांक १२/१०/२०२१ अन्वये कोणतीही कार्यवाही न करता मार्गदर्शनपर प्रस्ताव सादर केला होता. त्यानुसार आयुक्तालयाचे पत्र दिनांक ०१/१२/२०२१ अन्वये अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.